रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 3
Part XII Section 3
भाग बारा अनुभाग ३

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 3] | नई दिल्ली, अगस्त 7-13, 2025/श्रावण 16-22 (शक) 1947 | [ खंड 22 |
| No. 3] | NEW DELHI, AUGUST 7-13, 2025/SHRAVAN 16-22 (SAKA) 1947 | [Vol. 22 |
| अं. ३] | नई दिल्ली, ऑगस्ट ७-१३, २०२५/श्रावण १६-२२ (शके) १९४७ | [ खंड २२ |

सर्व संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि इंस्टिट्यूट ऑफ टिचिंग अँड रिसर्च इन आयुर्वेद अॅक्ट, 2020 ; (2) दि भारतीय साक्ष्य अधिनियम, 2023 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 ( 1973 का 50 ) की धारा 2 के खण्ड़ (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

**MINISTRY OF LAW AND JUSTICE**

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (*1*) The Institute of Teaching and Research in Ayurveda Act, 2020; (*2*) The Bharatiya Sakshya Adhiniyam, 2023 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

**विधि व न्याय मंत्रालय**

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि इंस्टिट्यूट ऑफ टिचिंग अँड रिसर्च इन आयुर्वेद ॲक्ट, २०२०; (२) दि भारतीय साक्ष्य अधिनियम, २०२३ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

**निर्देशसूची**

INDEX



| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्था अधिनियम, २०२०<br>The Institute of Teaching and Research in Ayurveda Act, 2020 | ५ |
| २ | भारतीय साक्ष्य अधिनियम, २०२३<br>The Bharatiya Sakshya Adhiniyam, 2023 | १७ |

# आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्था अधिनियम, २०२०

## (२०२० चा अधिनियम क्रमांक १६)

[ २३ एप्रिल, २०२५ रोजी यथाविद्यमान ]

[२१ सप्टेंबर, २०२०. ]

आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्थेची स्थापना करण्यासाठी आणि आयुर्वेद व संलग्न ज्ञानशाखा यांमधील शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण यांमधील गुणवत्ता व सर्वोत्कृष्टता यांस चालना देण्यासाठी एक राष्ट्रीय महत्त्वाची संस्था म्हणून तिला घोषित करण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या एकाहत्तराव्या वर्षी, संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :–

प्रकरण एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्था अधिनियम, २०२०, असे म्हणावे.

(२) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास[१] अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

**एक राष्ट्रीय महत्त्वाची संस्था म्हणून आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्थेस घोषित करणे.**

**२.** (१) याद्वारे असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमान्वये विधिसंस्थापित केलेली आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्था ही, एक राष्ट्रीय महत्त्वाची संस्था असेल.

**व्याख्या.**

**३.** या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,–

(क) "पूर्ववर्ती संस्था" याचा अर्थ, आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अध्यापन व संशोधन संस्था, जामनगर, श्री गुलाबकुंवरबा आयुर्वेद महाविद्यालय, जामनगर आणि भारतीय आयुर्वेदिक औषधनिर्माणशास्त्र संस्था, असा आहे;

(ख) "स्वास्थ्यवृत्त विभाग" याचा अर्थ, संस्थेचा एक विभाग म्हणून स्थापन करावयाची, गुजरात आयुर्वेद विद्यापीठाची घटक संस्था असलेली, महर्षी पतंजली योग, निसर्गोपचार शिक्षण व संशोधन संस्था, असा आहे;

(ग) "संचालक" याचा अर्थ, कलम ११ च्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेला संस्थेचा संचालक, असा आहे;

(घ) "निधी" याचा अर्थ, कलम १५ अन्वये ठेवलेला संस्थेचा निधी, असा आहे;

(ङ) "नियामक मंडळ" याचा अर्थ, कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेले मंडळ, असा आहे;

---

१. १५ ऑक्टोबर, २०२०, अधिसूचना क्र. एस. ओ. ३६०८(इ), १४ ऑक्टोबर, २०२० अन्वये पहा-**भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग दोन, अनुभाग ३ (दोन)

(च) "गुजरात आयुर्वेद विद्यापीठ" याचा अर्थ, गुजरात आयुर्वेद विद्यापीठ अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन व विधिसंस्थापित केलेले विद्यापीठ, असा आहे; १९६५ चा ४०.

(छ) "भारतीय आयुर्वेदिक औषधनिर्माणशास्त्र संस्था, जामनगर" याचा अर्थ, आयुर्वेदातील औषधनिर्माणशास्त्र पाठ्यक्रम चालविण्यासाठी गुजरात आयुर्वेद विद्यापीठाने स्थापन केलेली संस्था, असा आहे आणि त्यामध्ये, त्या संस्थेच्या रुग्णालयामध्ये वापरण्याकरिता आयुर्वेदिक औषधिद्रव्ये तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या औषधनिर्माणशास्त्र युनिटाचा अंतर्भाव होतो;

(ज) "संस्था" याचा अर्थ, कलम ४ अन्वये पूर्ववर्ती संस्थांना संगुटित करून स्थापन व विधिसंस्थापित केलेली आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्था, असा आहे;

(झ) "आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अध्यापन व संशोधन संस्था, जामनगर" याचा अर्थ, भारत सरकारने स्थापन केलेली व निधी पुरवठा केलेली परंतु, भारत सरकार व ते विद्यापीठ यांच्यामध्ये केलेल्या भाडेपट्टा करारान्वये गुजरात आयुर्वेद विद्यापीठाने चालविलेली राष्ट्रीय आयुर्वेद पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम संस्था, असा आहे;

(ञ) "सदस्य" याचा अर्थ, संस्थेचा सदस्य, असा आहे;

(ट) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(ठ) "विनियम" याचा अर्थ, संस्थेने केलेले विनियम, असा आहे;

(ड) "श्री गुलाबकुंवरबा आयुर्वेद महाविद्यालय, जामनगर" याचा अर्थ, आयुर्वेदातील पदवी पाठ्यक्रम चालविण्यासाठी असलेली गुजरात आयुर्वेद विद्यापीठाची एक घटक संस्था, असा आहे.

प्रकरण दोन

## संस्था

**आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्था म्हणून पूर्ववर्ती संस्थांची स्थापना व तिचे विधिसंस्थापन.**

**४.** (१) पूर्ववर्ती संस्थांना, म्हणजेच, आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अध्यापन व संशोधन संस्था, जामनगर, श्री गुलाबकुंवरबा आयुर्वेद महाविद्यालय, जामनगर आणि भारतीय आयुर्वेदिक औषधनिर्माण विज्ञान संस्था, जामनगर यांना याद्वारे या अधिनियमान्वये एक निगम निकाय म्हणून संगुटित व स्थापन केले जात आहे आणि त्यांचे असे विधिसंस्थापन झाल्यावर, त्यांना, आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्था असे संबोधण्यात येईल.

(२) त्या संस्थेस, कोणतीही जंगम व स्थावर अशा दोन्ही मालमत्तेचे संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा आणि त्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा व संविदा करण्याचा अधिकार असेल, तसेच, तिची एक शाश्वत उत्तराधिकार व सामाईक मोहोर असेल आणि त्या नावाने, तिला दावा दाखल करता येईल, किंवा तिच्याविरुध्द दावा दाखल करता येईल.

**आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्था म्हणून पूर्ववर्ती संस्थांचे विधिसंस्थापन केल्याचा परिणाम.**

**५.** या अधिनियमाच्या प्रारंभास आणि तेव्हापासून,—

(क) या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कायद्यातील, किंवा कोणत्याही संविदेतील अथवा इतर संलेखातील पूर्ववर्ती संस्थांबाबतचा कोणताही निर्देश हा, त्या संस्थेचा निर्देश असल्याचे मानण्यात येईल;

(ख) पूर्ववर्ती संस्थांची किंवा त्यांच्या मालकीची, सर्व जंगम व स्थावर मालमत्ता, त्या संस्थेकडे निहित होईल;

(ग) पूर्ववर्ती संस्थांचे सर्व हक्क व दायित्वे, त्या संस्थेकडे हस्तांतरित होतील आणि ते, त्या संस्थेचे हक्क व दायित्वे बनतील;

(घ) अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी, पूर्ववर्ती संस्थांमध्ये सेवानियुक्त असलेली प्रत्येक व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, जर हा अधिनियम संमत झाला नसता तर तिने जितक्या अवधीसाठी, ज्या परिश्रमिकावर, ज्या अटी व शर्तींवर, आणि निवृत्तीवेतन, रजा, उपदान, भविष्यनिर्वाह निधी आणि इतर बाबी यांसंबंधातील ज्या हक्कांसह व विशेषाधिकारांसह पद धारण केले असते तेवढ्याच अवधीसाठी, त्याच पारिश्रमिकावर, त्याच अटी व शर्तीवर आणि त्याच हक्कांसह व विशेषाधिकारांसह त्या संस्थेची कर्मचारी होईल आणि त्यात आपले पद धारण करील किंवा सेवा करील, आणि तिची नोकरी समाप्त झाल्याशिवाय व तोपर्यंत किंवा असा पदावधी, पारिश्रमिक आणि अटी व शर्ती यांमध्ये विनियमांद्वारे यथोचित फेरबदल करण्यात येईपर्यंत ती आपले पद धारण करणे चालू ठेवील :

परंतु, जर अशा रीतीने केलेला फेरबदल अशा कर्मचाऱ्यास स्वीकार्य नसेल तर, त्या कर्मचाऱ्याबरोबर केलेल्या संविदेच्या अटींनुसार किंवा जर याबाबतीत त्यात कोणतीही तरतूद केलेली नसेल तर, स्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तीन महिन्यांच्या पारिश्रमिकापेक्षा कमी नसेल इतकी आणि इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, एका महिन्याच्या पारिश्रमिकापेक्षा कमी नसेल इतकी नुकसानभरपाई, संस्थेकडून त्याला प्रदान केल्यावर, संस्थेला त्याची नोकरी समाप्त करता येईल;

(ङ) आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अध्यापन व संशोधन संस्था, जामनगर याच्या संचालकास, या अधिनियमाखालील संस्थेचा संचालक म्हणून नियुक्त केले असल्याचे मानण्यात येईल आणि तो, अशा प्रारंभापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्याच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, पद धारण करील;

(च) श्री गुलाबकुंवरबा आयुर्वेद महाविद्यालय, जामनगर आणि भारतीय आयुर्वेदिक औषधनिर्माणशास्त्र संस्था, जामनगर यांचे संचालक, या अधिनियमान्वये अनुक्रमे उप संचालक (पदवीपूर्व ) आणि उप संचालक (औषधनिर्माणशास्त्र) म्हणून नियुक्त केले असल्याचे मानण्यात येईल, आणि ते, अशा प्रारंभापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा ते वयाची पासष्ट वर्षे पूर्ण करीपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, पद धारण करतील;

(छ) अशा प्रारंभापूर्वी पूर्ववर्ती संस्थांमध्ये कोणताही शिक्षण किंवा संशोधन पाठ्यक्रम शिकणारी प्रत्येक व्यक्ती, संस्थेमधील पाठ्यक्रमाच्या त्याच स्तरावर त्या संस्थेकडे स्थलांतरित आणि नोंदणीकृत झाली असल्याचे मानण्यात येईल;

(ज) अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी पूर्ववर्ती संस्थांनी दाखल केलेले किंवा त्यांच्याविरुध्द दाखल करण्यात आलेले अथवा दाखल करता येऊ शकतील असे सर्व दावे व इतर कायदेशीर कार्यवाह्या या, संस्थेकडून किंवा तिच्याविरुध्द चालू ठेवण्यात येईल.

६. (१) संस्थेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :– **संस्थेची रचना.**

(क) आयुष मंत्रालयाचा प्रभारी मंत्री, पदसिद्ध सदस्य;

(ख) आयुष मंत्रालयातील भारत सरकारचा सचिव, पदसिद्ध सदस्य;

(ग) सचिव, आरोग्य विभाग, गुजरात शासन, पदसिद्ध सदस्य;

(घ) संस्थेचा संचालक, पदसिद्ध सदस्य;

(ङ) सल्लागार (आयुर्वेद), आयुष मंत्रालय, याच्या स्तरापेक्षा कमी नसलेला, आयुर्वेद तंत्रप्रमुख, पदसिद्ध सदस्य;

(च) भारत सरकारचा सचिव किंवा त्याचा नामनिर्देशिती (सह सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला), वित्त मंत्रालय, व्यय विभाग, पदसिद्ध सदस्य;

(छ) कुलगुरू, गुजरात आयुर्वेद विद्यापीठ, जामनगर, पदसिद्ध सदस्य;

(ज) महासंचालक, केंद्रीय आयुर्वेद संशोधन परिषद, पदसिद्ध सदस्य;

(झ) उच्च शिक्षण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय यामधील भारत सरकारचा सचिव किंवा त्याचा नामनिर्देशिती (सह सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला), पदसिद्ध सदस्य;

(ञ) केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाचे शिक्षण, उद्योग व संशोधन या क्षेत्रातील विशेष ज्ञान व अनुभव असलेले, आयुर्वेदातील तीन तज्ज्ञ;

(ट) संसदेचे तीन सदस्य, त्यांपैकी दोन सदस्य, लोकसभा सदस्य त्यांच्यामधून आणि एक सदस्य, राज्यसभा सदस्य त्यांच्यामधून निवडून देतील.

(२) याद्वारे असे घोषित करण्यात येते की, संस्थेच्या सदस्य पदामुळे, त्याचा धारक, संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा सदस्य होण्यास अपात्र ठरणार नाही.

**सदस्यांचा पदावधी, व त्यांच्यामधील रिक्त जागा.**

७. (१) या कलमामध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, संस्थेच्या नामनिर्देशित केलेल्या किंवा निवडून दिलेल्या सदस्यांसह, एखाद्या सदस्याचा पदावधी, त्याच्या नामनिर्देशनाच्या किंवा निवडून दिल्याच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका असेल.

(२) कलम ६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ट) अन्वये निवडून दिलेल्या सदस्याचा पदावधी, तो मंत्री किंवा राज्यमंत्री किंवा उपमंत्री किंवा लोकसभा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा राज्यसभेचा उप सभापती होताच अथवा ज्या सभागृहातून त्याला निवडून दिले होते त्या सभागृहाचा सदस्य असण्याचे बंद होताच, संपुष्टात येईल.

(३) एखाद्या पदसिद्ध सदस्याचा पदावधी, ज्या पदाच्या आधारे तो सदस्य असेल ते पद जितका काल धारण करतो तेथपर्यंत चालू राहील.

(४) नैमित्तिक रिक्त जागा भरण्याकरिता नामनिर्देशित केलेल्या किंवा निवडून दिलेल्या एखाद्या सदस्याचा पदावधी, ज्या सदस्याच्या जागेवर त्याला नामनिर्देशित करण्यात आले असेल किंवा निवडून देण्यात आले असेल त्या सदस्याच्या उर्वरित कालावधीसाठी चालू राहील.

(५) एखादा मावळता सदस्य, केंद्र सरकारने अन्यथा निर्देश दिला नसेल तर, त्याच्या जागी दुसऱ्या व्यक्तीला सदस्य म्हणून नामनिर्देशित केले जाईपर्यंत किंवा निवडून दिले जाईपर्यंत पदावर कायम राहील.

(६) एखाद्या सदस्यास, केंद्र सरकारला उद्देशून आपल्या सहीनिशी आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल परंतु, त्याचा राजीनामा त्या शासनाकडून स्वीकारला जाईपर्यंत तो त्या पदावर राहील.

(७) सदस्यांमधील रिक्त जागा भरण्याची रीत, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

**संस्थेचा अध्यक्ष.**

८. (१) संस्थेचा एक अध्यक्ष असेल, तो, संस्थेच्या संचालकाव्यतिरिक्त इतर सदस्यांमधून केंद्र सरकारकडून नामनिर्देशित करण्यात येईल.

(२) अध्यक्ष, या अधिनियमामध्ये निर्धारित केलेले असतील किंवा विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कार्ये पार पाडील.

(३) अध्यक्ष व इतर सदस्य यांना, विहित करण्यात येतील असे भत्ते संस्थेकडून मिळतील.

**संस्थेच्या बैठका.**

**९.** संस्था, केंद्र सरकारकडून नेमून देण्यात येईल, अशा वेळी व अशा ठिकाणी आपली पहिली बैठक घेईल, आणि त्या सरकारकडून निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे पहिल्या बैठकीतील कामकाज चालविण्यासंबंधातील कार्यपद्धतीविषयक नियमांचे पालन करील आणि त्यानंतर, संस्था, विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळी व अशा ठिकाणी बैठक घेईल आणि तिच्या बैठकीतील कामकाज चालविण्यासंबंधातील कार्यपद्धतीविषयक (गणपूर्तीसह) नियमांचे पालन करील.

**संस्थेचे नियामक मंडळ व इतर समित्या.**

**१०.** (१) संस्थेचे एक नियामक मंडळ असेल, जे, विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने संस्थेकडून घटित करण्यात येईल.

(२) नियामक मंडळ ही, संस्थेची कार्यकारी समिती असेल आणि संस्था, याबाबतीत केलेल्या विनियमांद्वारे त्याला प्रदान करील किंवा त्याच्याकडे सोपवील, अशा अधिकारांचा वापर करील व अशी कार्ये पार पाडील.

(३) संस्थेचा अध्यक्ष हा, नियामक मंडळाचा अध्यक्ष असेल, आणि तिचा अध्यक्ष म्हणून, विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कार्ये पार पाडील.

(४) नियामक मंडळाने त्याच्या अधिकारांचा वापर करताना आणि त्याची कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती आणि नियामक मंडळाच्या सदस्यांचा पदावधी आणि त्यांच्यामधील रिक्त जागा भरण्याची रीत, विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(५) विहित करण्यात येईल असे नियंत्रण व निर्बंध यांस अधीन राहून, संस्थेस, संस्थेच्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठी किंवा तिची कोणतीही कार्ये पार पाडण्यासाठी, किंवा संस्था, त्यांच्याकडे निर्दिष्ट करील अशा कोणत्याही बाबींची चौकशी करण्यासाठी, किंवा त्यावर अहवाल देण्यासाठी किंवा त्याबाबत सल्ला देण्यासाठी विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने, तिला योग्य वाटतील इतक्या संख्येतील स्थायी समित्या व तदर्थ समित्या घटित करता येतील.

(६) नियामक मंडळाचा सभापती व सदस्य आणि स्थायी समितीचा किंवा तदर्थ समितीचा अध्यक्ष व सदस्य यांना विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल असे भत्ते मिळतील.

**संस्थेचा कर्मचारीवर्ग.**

**११.** (१) संस्थेचा एक मुख्य कार्यकारी अधिकारी असेल, त्याला संस्थेचा संचालक म्हणून पदनिर्देशित करण्यात येईल आणि याबाबतीत केंद्र सरकारकडून करण्यात येतील अशा नियमांस अधीन राहून, त्यास संस्थेकडून नियुक्त करण्यात येईल :

परंतु, आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अध्यापन व संशोधन संस्था, जामनगर याच्या संचालकास, त्या संस्थेचा प्रथम संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

(२) संचालक, आपले पद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीसाठी किंवा तो, वयाची पासष्ट वर्षे पूर्ण करीपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, पद धारण करील.

(३) संचालक, विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा किंवा संस्थेकडून किंवा संस्थेच्या अध्यक्षाकडून किंवा नियामक मंडळाकडून किंवा नियामक मंडळाच्या अध्यक्षाकडून त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कार्ये पार पाडील.

(४) याबाबतीत, केंद्र सरकारकडून करण्यात येतील अशा नियमांस अधीन राहून, संस्थेस, उप संचालक (पदवीपूर्व), उप संचालक (पदव्युत्तर) आणि उप संचालक (औषधनिर्माणशास्त्र) यांची आणि तिच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व तिची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा संख्येतील इतर अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांचे पदनाम व श्रेणी विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे असेल :

परंतु, श्री गुलाबकुंवरबा आयुर्वेद महाविद्यालय, जामनगर याच्या संचालकास, त्या संस्थेचा प्रथम उप संचालक (पदवीपूर्व) म्हणून नियुक्त करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :

परंतु आणखी असे की, भारतीय आयुर्वेदिक औषधनिर्माणशास्त्र, जामनगर संस्थेच्या संचालकास, या अधिनियमान्वये प्रथम उप संचालक (औषधनिर्माणशास्त्र) म्हणून नियुक्त करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

(५) संस्थेचा संचालक, उप संचालक (पदवीपूर्व), उप संचालक (पदव्युत्तर) आणि उप संचालक (औषधनिर्माणशास्त्र) आणि इतर अधिकारी व कर्मचारी हे, विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल असे वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असतील आणि रजा, निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी व इतर बाबी यांच्या बाबतीतील सेवेच्या अशा शर्तीद्वारे त्यांचे नियमन करण्यात येईल.

संस्थेची उद्दिष्टे.

**१२.** संस्थेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील,–

(क) भारतातील सर्व आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालये व इतर संलग्न आयुर्वेद संस्था यांतील वैद्यकीय शिक्षणाचा उच्च दर्जा सिद्ध करता यावा म्हणून आयुर्वेद व औषधनिर्माणशास्त्र यांमधील पदवीपूर्व व पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणातील अध्यापन पद्धती विकसित करणे;

(ख) औषधनिर्माणशास्त्रासह आयुर्वेदाच्या सर्व महत्त्वाच्या शाखांमधील कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी उच्च प्रतीच्या शैक्षणिक सुविधा एकाच ठिकाणी एकत्र आणणे;

(ग) आयुर्वेदातील विशेषज्ञ व वैद्यकीय अध्यापकांच्या देशाच्या गरजा भागविण्याकरिता पदव्युत्तर पदवी शिक्षणामध्ये स्वयंपूर्णता साध्य करणे;

(घ) आयुर्वेदाच्या क्षेत्रामध्ये सखोल अध्ययन व संशोधन करणे.

संस्थेची कार्ये.

**१३.** कलम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उद्दिष्टांचे प्रचालन करण्याच्या दृष्टीने, संस्थेस,–

(क) औषधनिर्माणशास्त्रासह आयुर्वेदातील पदवीपूर्व व पदव्युत्तर पदवी अध्यापनाची तरतूद करता येईल;

(ख) औषधनिर्माणशास्त्रासह आयुर्वेदातील विविध शाखांमधील संशोधनासाठी सुविधांची तरतूद करता येईल;

(ग) औषधनिर्माणशास्त्रासह आयुर्वेदातील पदवीपूर्व व पदव्युत्तर असे दोन्ही अभ्यास पाठ्यक्रम व अभ्यासक्रम विहित करता येईल;

(घ) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही,–

(एक) औषधनिर्माणशास्त्रासह पदवीपूर्व व पदव्युत्तर पदवी आयुर्वेद शिक्षण घेण्यासाठी आधुनिक वैज्ञानिक प्रगत तंत्रज्ञान, पुरेसा कर्मचारीवर्ग व साधनसामग्री यांच्या मदतीने, आयुर्वेदाची वैज्ञानिक विधिग्राह्यता, सार्वजनिक आरोग्यात आयुर्वेद तत्वे व सिद्धांत अंमलात आणणे आणि अष्टांग आयुर्वेदाचा आणखी प्रसार करणे यांकरिता स्वास्थ्यवृत्त विभागासह विविध विभाग असलेले एक किंवा अधिक आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालये आणि आवश्यक वाटतील असे इतर विभाग;

(दोन) साधनसामग्रीने सुसज्ज असलेली एक किंवा त्यापेक्षा अधिक रुग्णालये;

(तीन) परिचारिका, औषधनिर्माते, पंचकर्म तंत्रज्ञ किंवा उपचारतज्ज्ञ यांसारख्या आयुर्वेद सहाय्यभूत कर्मचारीवर्गाकरिता महाविद्यालये आणि अशा विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी पुरेसा कर्मचारीवर्ग आणि साधनसामग्री यांनी सुसज्ज असेल अशा आयुर्वेदाच्या इतर संलग्न शाखा;

(चार) ज्या संघटना आयुर्वेदातील क्षेत्र प्रशिक्षणासाठी व सामूहिक आरोग्य समस्यांच्या संशोधनासाठी केंद्रे बनतील अशा ग्रामीण व नागरी आरोग्य संघटना; आणि

(पाच) भौतिकोपचार तज्ज्ञ, व्यवसायोपचार तज्ज्ञ आणि विविध प्रकारचे आयुर्वेदिक वैद्यकीय तंत्रज्ञ यांसारखे विभिन्न प्रकारचे आरोग्य कर्मचारी यांच्या प्रशिक्षणासाठी इतर संस्था,

स्थापन करता येतील व चालविता येतील;

(ङ) भारतातील विभिन्न आयुर्वेद महाविद्यालयांतील अध्यापकांना प्रशिक्षण देता येईल;

(च) विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे आयुर्वेदातील व औषधनिर्माणशास्त्रातील पदवीपूर्व व पदव्युत्तर शिक्षणातील परीक्षा (प्रवेश परीक्षांसह) घेता येतील आणि पदव्या, पदविका व इतर विद्याविषयक मानविशेष व उपाध्या देता येतील;

(छ) विनियमांनुसार प्राध्यापक पदे, प्रपाठक पदे, अधिव्याख्याता पदे आणि कोणत्याही वर्णनाची पदे निर्माण करता येतील व त्यांवर व्यक्तींची नियुक्ती करता येईल;

(ज) शासनाकडून अनुदाने आणि देणगीदार, हितकर्ते, मृत्युपत्रकर्ते किंवा, यथास्थिती, हस्तांतरक यांच्याकडून बक्षिसे, देणग्या, धर्मदाने, मृत्युपत्रित दाने व जंगम व स्थावर अशा दोन्ही मालमत्ता यांचे हस्तांतरण स्वीकारता येईल;

(झ) कलम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उद्दिष्टांचे प्रचालन करण्यासाठी आवश्यक वाटेल अशा कोणत्याही रीतीने, संस्थेची मालकी असलेली किंवा तिच्याकडे निहित असलेली कोणतीही मालमत्ता यांबाबत कार्यवाही करता येईल;

(ञ) विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल असे शुल्क व इतर आकार यांची मागणी करता येईल व ते स्वीकारता येईल;

(ट) याबाबतीत करण्यात येतील अशा विनियमांनुसार, आपल्या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधता येतील व कर्मचाऱ्यांना अशा निवासस्थानांचे वाटप करता येईल;

(ठ) विद्यार्थ्यांच्या निवासासाठी निवासगृहे व वसतीगृहे स्थापन करता येईल, ते चालवता येईल आणि त्यांचे व्यवस्थापन करता येईल;

(ड) संस्थेच्या निवासस्थानांचे पर्यवेक्षण करता येईल व त्यांचे नियंत्रण करता येईल आणि संस्थेतील विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे नियमन करता येईल व त्यांचे आरोग्य, सर्वसाधारण कल्याण व सांस्कृतिक व समूह जीवन यांचे प्रचालन करण्याची व्यवस्था करता येईल ;

(ढ) अधिछात्रवृत्ती, शिष्यवृत्त्या, विद्यार्थी सहायता अनुदाने, बक्षिसे व पदके सुरु करता येतील व ती प्रदान करता येतील;

(ण) संस्थेच्या मालमत्तेच्या तारणावर केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने पैसा कर्जाऊ घेता येतील;

(त) संस्थेची सर्व किंवा त्यापैकी कोणतीही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक आनुषंगिक व हितकारक असतील अशा सर्व गोष्टी करता येतील.

**संस्थेला रकमा प्रदान करणे.**

**१४.** केंद्र सरकारला, याबाबतीत संसदेने कायद्याद्वारे यथायोग्य विनियोजन केल्यानंतर, संस्थेला, या अधिनियमाखालील तिच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची कार्ये पार पाडण्यासाठी, आवश्यक वाटेल अशा रकमा अशा रीतीने प्रत्येक वित्तीय वर्षात प्रदान करता येतील.

**संस्थेचा निधी.**

**१५.** (१) संस्था, एक निधी ठेवील, त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील :–

(क) केंद्र सरकारकडून देण्यात येणारा सर्व पैसा;

(ख) संस्थेला प्राप्त झालेले, सर्व शुल्क व इतर आकार;

(ग) अनुदाने, बक्षिसे, देणग्या, धर्मदाने, मृत्युपत्रित दाने व हस्तांतरणे या मार्गाने संस्थेला प्राप्त होणारा सर्व पैसा, आणि;

(घ) इतर कोणत्याही रीतीने किंवा इतर कोणत्याही स्त्रोताकडून संस्थेला प्राप्त होणारा सर्व पैसा.

(२) निधीमध्ये जमा होणारा सर्व पैसा, संस्था, केंद्र सरकारच्या मान्यतेने ठरवील अशा रीतीने बँकांमध्ये जमा करण्यात येईल किंवा गुंतवण्यात येईल.

(३) कलम १३ अन्वये तिच्या अधिकारांचा वापर करताना व तिची कर्तव्ये पार पाडताना केलेल्या खर्चासह, संस्थेचा खर्च भागविण्यासाठी निधीचा विनियोग करण्यात येईल.

**संस्थेचे अंदाजपत्रक.** **१६.** संस्था, संस्थेच्या अंदाजित जमा रकमा व खर्च दर्शविणारे पुढील आगामी वित्तीय वर्षाच्या संबंधातील अंदाजपत्रक, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा वेळी प्रत्येक वर्षी तयार करील आणि त्याच्या अशा संख्येतील प्रती केंद्र सरकारकडे पाठवील.

**लेखे व लेखापरीक्षा.** **१७.** (१) संस्था, केंद्र सरकार नियमांद्वारे विहित करील अशा नमुन्यात, आणि भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक याच्याशी विचारविनिमय करून, त्या सरकारकडून देण्यात येतील अशा सर्वसाधारण निदेशांनुसार, यथोचित लेखे व इतर संबद्ध अभिलेख ठेवील आणि ताळेबंदासह लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(२) संस्थेचे लेखे, भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून लेखापरिक्षित करण्यात येतील आणि अशा लेखापरीक्षेच्या संबंधात त्याने केलेला कोणताही खर्च, संस्थेकडून भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक याला प्रदेय असेल.

(३) संस्थेच्या लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधात, भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षकास आणि त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, शासकीय लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधात भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षकास जसे हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तसेच हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार अशा लेखापरीक्षेच्या संबंधात असतील, आणि विशेषतः, संस्थेची पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके व इतर दस्तऐवज आणि कागदपत्रे सादर करण्यास सांगण्याचा आणि संस्थेच्या कार्यालयांची तपासणी करण्याचा हक्क असेल.

(४) भारताच्या नियंत्रक व लेखापरीक्षकाने किंवा याबाबतीत त्याने नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने प्रमाणित केलेले संस्थेचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह, दरवर्षी केंद्र सरकारकडे पाठविण्यात येतील आणि ते सरकार, ते संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

**वार्षिक अहवाल.** **१८.** संस्था, प्रत्येक वर्षी, त्या वर्षातील आपल्या कार्याचा एक अहवाल तयार करील, आणि तो, विहित करण्यात येईल, अशा नमुन्यात व अशा दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी केंद्र सरकारला सादर करील आणि या अहवालाची एक प्रत, ती प्राप्त झाल्यापासून एका महिन्याच्या आत संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर मांडण्यात येईल.

**निवृत्तिवेतन व भविष्यनिर्वाह निधी.** **१९.** (१) संस्था, तिचे अधिकारी, अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या लाभासाठी, विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून, तिला योग्य वाटेल असे निवृत्तीवेतन व भविष्यनिर्वाह निधी घटित करील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी पूर्ववर्ती संस्थांनी घटित केलेला निवृत्तीवेतन व भविष्यनिर्वाह निधी हा, या कलमाखालील निवृत्तीवेतन व भविष्यनिर्वाह निधी असल्याचे मानण्यात येईल.

(२) जेव्हा असा कोणताही भविष्यनिर्वाह निधी घटित करण्यात आला असेल त्याबाबतीत, केंद्र सरकारला असे घोषित करता येईल की, जणू काही तो शासकीय भविष्यनिर्वाह निधी होता असे समजून भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९२५ याच्या तरतुदी, अशा निधीला लागू होतील. १९२५ चा १९.

**२०.** संस्थेचे सर्व आदेश व निर्णय, संचालकाकडून किंवा याबाबतीत संस्थेने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही सदस्याकडून अधिप्रमाणित करण्यात येतील आणि इतर सर्व संलेख, संचालकाच्या किंवा संस्थेकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा इतर कोणत्याही अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने अधिप्रमाणित करण्यात येतील. **संस्थेच्या आदेशांचे व संलेखाचे अधिप्रमाणन.**

**२१.** या अधिनियमान्वये, संस्थेने, नियामक मंडळाने किंवा कोणत्याही स्थायी किंवा तदर्थ समितीने केलेल्या कोणत्याही कृती किंवा हाती घेतलेली कार्यवाही ही, अशा संस्थेत, नियामक मंडळात व अशा स्थायी किंवा तदर्थ समितीमध्ये कोणतेही रिक्तपद असल्याच्या किंवा त्यांच्या रचनेमध्ये कोणताही दोष असल्याच्या कारणावरून प्रश्नास्पद केली जाणार नाही. **रिक्त पदे, इत्यादींमुळे कृती व कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.**

**२२.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, संस्थेस, या अधिनियमान्वये कोणत्याही वैद्यकीय पदव्या, पदविका व इतर विद्याविषयक मानविशेष व उपाध्या प्रदान करण्याचा अधिकार असेल. **संस्थेकडून पदव्या, पदविका, इत्यादी प्रदान करणे.**

१९७० चा ४९. **२३.** भारतीय औषधवैद्यक केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० आणि विद्यापीठ अनुदान आयोग
१९५६ चा ३. अधिनियम, १९५६ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये संस्थेने प्रदान केलेल्या वैद्यकीय पदव्या किंवा पदविका या, उपरोक्त अधिनियमांच्या प्रयोजनांसाठी मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता असतील आणि त्या संबंधित अधिनियमांच्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केल्या असल्याचे मानण्यात येईल. **संस्थेने दिलेल्या वैद्यकीय अर्हतांची मान्यता.**

**२४.** संस्था, या अधिनियमाच्या प्रभावी प्रशासनासाठी केंद्र सरकारकडून वेळोवेळी जारी करण्यात येतील अशा निदेशांचे पालन करील. **केंद्र सरकारकडून नियंत्रण.**

**२५.** जर, या अधिनियमान्वये संस्थेने तिच्या अधिकारांचा वापर करताना व तिची कार्ये पार पाडताना किंवा त्यासंबंधात, संस्था व केंद्र सरकार यांच्यामध्ये कोणताही विवाद किंवा मतभेद उद्भवले तर, त्यावरील केंद्र सरकारचा निर्णय अंतिम असेल. **मतभेदांवरील निर्णय.**

**२६.** संस्था, केंद्र सरकार वेळोवेळी मागणी करेल असे अहवाल, विवरणे व इतर माहिती, केंद्र सरकारला सादर करील. **विवरणे व माहिती.**

**२७.** (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करता येतील. **नियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषतः व पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ७ च्या पोट-कलम (७) अन्वये संस्थेच्या सदस्यांमधील रिक्त जागा भरण्याची रीत;

(ख) कलम ८ च्या पोट-कलम (२) अन्वये संस्थेच्या अध्यक्षाने वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कार्ये;

(ग) कलम ८ च्या पोट-कलम (३) अन्वये संस्थेचे अध्यक्ष व सदस्य यांना प्रदान करावयाचे भत्ते, कोणतेही असल्यास;

(घ) कलम १० च्या पोट-कलम (५) खालील स्थायी समित्या व तदर्थ समित्या यांच्या रचनेसंबंधातील नियंत्रण व निर्बंध;

(ङ) कलम १६ अन्वये संस्थेच्या अंदाजित जमा रकमा व खर्च दर्शविणारे अंदाजपत्रक ज्या नमुन्यात व ज्या मुदतीत तयार करण्यात येईल तो नमुना व ती रीत आणि केंद्र सरकारकडे पाठवावयाच्या त्या अंदाजपत्रकाच्या प्रतींची संख्या;

(च) कलम १८ अन्वये ज्या नमुन्यात वार्षिक अहवाल तयार करण्यात येईल तो नमुना आणि ज्या दिनांकापूर्वी असा अहवाल, केंद्र सरकारला सादर करण्यात येईल तो दिनांक;

(छ) विहित करावयाची आहे किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

विनियम करण्याचा अधिकार.

**२८.** (१) संस्थेस, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता या अधिनियमाशी व त्याखाली केलेल्या नियमांशी सुसंगत असे विनियम करता येतील आणि या अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा विनियमांत पुढील बाबींची तरतूद करता येईल :–

(क) कलम ९ अन्वये संस्थेच्या पहिल्या बैठकीव्यतिरिक्त इतर बैठका बोलाविणे व त्या घेणे, ज्या वेळेत व ठिकाणी अशा बैठका घेण्यात येतील ते ठिकाण व वेळ, अशा बैठकांमध्ये कामकाज चालविणे आणि गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेल्या सदस्यांची संख्या;

(ख) कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये नियामक मंडळ घटित करण्याची रीत;

(ग) कलम १० च्या पोट-कलम (२) अन्वये नियामक मंडळाने वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कार्ये,

(घ) कलम १० च्या पोट-कलम (३) अन्वये संस्थेच्या अध्यक्षाने वापरावयाचे अधिकार आणि पार पाडावयाची कार्ये;

(ङ) कलम १० च्या पोट-कलम (४) अन्वये नियामक मंडळाने अनुसरावयाची कार्यपद्धती, नियामक मंडळाच्या सदस्यांचा पदावधी, आणि त्या सदस्यांमधील रिक्त जागा भरण्याची रीत;

(च) कलम १० च्या पोट-कलम (५) अन्वये स्थायी समित्या आणि तदर्थ समित्या घटित करण्याची रीत;

(छ) कलम १० च्या पोट-कलम (६) अन्वये नियामक मंडळ आणि स्थायी समिती व तदर्थ समिती यांचे अध्यक्ष व सदस्य यांना द्यावयाचे भत्ते, कोणतेही असल्यास;

(ज) कलम ११ च्या पोट-कलम (३) अन्वये संस्थेच्या संचालकाने वापरावयाचे अधिकार आणि पार पाडावयाची कार्ये;

(झ) कलम ११ च्या पोट-कलम (४) अन्वये इतर अधिकारी व कर्मचारी यांची पदनामे व श्रेण्या;

(ञ) कलम ११ च्या पोट-कलम (५) अन्वये संस्थेचे संचालक, उप संचालक (पदवीपूर्व), उप संचालक (पदव्युत्तर) आणि उप संचालक (औषधनिर्माणशास्त्र) आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते आणि त्यांच्या इतर सेवाशर्ती;

(ट) कलम १३ च्या खंड (च) अन्वये, संस्थेकडून घेण्यात येतील अशा परीक्षा आणि प्रदान करण्यात येतील अशा पदव्या, पदविका आणि इतर विद्याविषयक मानविशेष व उपाध्या;

(ठ) कलम १३ च्या खंड (छ) अन्वये संस्थेकडून निर्माण करण्यात येतील अशी प्राध्यापक पदे, प्रपाठक पदे, अधिव्याख्याता पदे व इतर पदे आणि अशी प्राध्यापक पदे, प्रपाठक पदे, अधिव्याख्याता पदे व इतर पदे यांवर नियुक्त करण्यात येतील अशा व्यक्ती;

(ड) कलम १३ च्या खंड (ञ) अन्वये संस्थेला मागणी करता येईल आणि स्वीकारता येईल असे शुल्क व इतर आकार;

(ढ) कलम १३ च्या खंड (ट) अन्वये कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांचे बांधकाम आणि अशा निवासस्थानांचे वाटप;

(ण) कलम १९ च्या पोट-कलम (१) अन्वये संस्थेचे अधिकारी, अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या लाभासाठी, ज्या रीतीने व ज्या शर्तींच्या अधीन राहून, निवृत्तिवेतन व भविष्यनिर्वाह निधी घटित करण्यात येईल ती रीत व त्या शर्ती;

(त) या अधिनियमान्वये ज्यासाठी विनियमांद्वारे तरतुदी करता येतील अशी इतर कोणतीही बाब.

(२) या अधिनियमान्वये संस्थेची स्थापना केली जाईपर्यंत, पोट-कलम (१) अन्वये करता येतील असे कोणतेही विनियम, केंद्र सरकारला करता येतील; आणि अशा प्रकारे केलेल्या कोणत्याही विनियमात, पोट-कलम (१) खालील आपल्या अधिकारांचा वापर करून, संस्थेकडून फेरबदल करता येईल किंवा ते विखंडीत करता येतील.

**संसदेसमोर ठेवावयाचे नियम व विनियम.**

**२९.** या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम व प्रत्येक विनियम, तो करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने मिळून बनलेल्या किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या, अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता, सत्रासीन असताना ठेवण्यात येईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात किंवा विनियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले अथवा तो नियम किंवा विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा विनियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये किंवा विनियमान्वये यापूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

**३०.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, केंद्र सरकारला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा या अधिनियमाच्या प्रयोजनांशी विसंगत नसलेल्या तरतुदी करता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तित्तक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

**संक्रमणकालीन तरतुदी.**

**३१.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी,–

(क) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कार्यरत असलेल्या पूर्ववर्ती संस्थांचे नियामक मंडळ किंवा इतर कोणतीही नियामक यंत्रणा, या अधिनियमाखालील, संस्थेसाठी नियामक मंडळ घटित केले जाईपर्यंत असे कार्य करणे चालू ठेवील, परंतु या अधिनियमान्वये नवीन नियामक मंडळ घटित झाल्यावर, असे घटित होण्यापूर्वी पद धारण करणारे मंडळाचे सदस्य, या अधिनियमामध्ये अन्यथा तरतूद केली नसेल तर, पद धारण करणे बंद करतील;

(ख) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी पूर्ववर्ती संस्थांच्या संबंधात घटित केलेल्या समित्या, संस्थेसाठी नवीन समित्या घटित केल्या जाईपर्यंत, या अधिनियमान्वये घटित केल्या असल्याचे मानण्यात येतील.